# राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
## महाराष्ट्र राज्य

| | | |
|---|---|---|
| अतिरिक्त संचालक<br>दूरध्वनी क्रमांक(वै.) -<br>कार्यालय दूरध्वनी क्र.- | २६०५८९९६<br>२६०५८७३९<br>२६०५८१३९<br>२६०५८४७६ | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण<br>माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटंब कल्याण<br>भवन, राजाबहादूर मिल रोड,रेल्वे स्टेशनच्यापाठीमागे,पुणे-१<br>फॅक्स नं.-०२०-२६०५८७६६ /२६०५८२१८/२६०५८१००<br>ई-मेल नं.adhscell@vsnl.net |
| **आरोग्य सेवा,**<br>**प्रथम मुदतवाढ** | | जा.क्र.राकुकका/रवका/सी.सी.टी व्ही/ कक्ष-१६अ/२०१७<br>दिनांक :- ३१ जुलै, २०१७ ४७८८ |

प्रति,
मा.सहसंचालक,
आरोग्य सेवा (खरेदी कक्ष)
आरोग्य सेवा संचालनालय,
मुंबई ४०० ००१.

विषय : कार्यालयामध्ये क्लोज सर्कीट टी.व्ही.यंत्रणा बसविणेसाठी आरोग्य विभागाच्या संकेतस्थळावर दरपत्रके मागविण्याकरीता नोटीस (सूचना) आरोग्य विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत.

संदर्भ : १) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक भांखस/२०१४/प्र.क्र.८२/भा- III/उद्योग-४, दि.१.१२.२०१६

२) या कार्यालयाचे मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ, सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभाग मंत्रालय, मुंबई यांना उद्देशून लिहीलेले पत्र क्र.राकुका/रवका/संगणक स्पेअर्स-सी.सी.टी.व्ही/३१२७७-७९/कक्ष-१६ अ, दि.२९.६.१७.

३) कक्ष अधिकारी, संचालक, माहिती तंत्रज्ञान, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि.४.७.२०१७ रोजीचे पत्र.

४) मा.अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (कु.क.) पुणे यांनी दि.११.७.२०१७ रोजी मान्य केलेली टिपण्णी.

५) या कार्यालयाचे पत्र क्र.राकुकका/रवका/सी.सी.टी.व्ही/४५०८४-८६/कक्ष-१६ अ/२०१७, दि.१८ जुलै, २०१७.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी या कार्यालयाचे दि.२९.६.१७ रोजीच्या पत्रास अनुसरुन कक्ष अधिकारी, संचालक, माहिती तंत्रज्ञान, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचे संदर्भिय दि.४.७.२०१७ रोजीच्या पत्रानुसार असे कळविले आहे की, सी.सी.टी.व्ही.बसविण्यासाठी दरपत्रकानुसार स्थानिक पातळीवर कार्यवाही करणे योग्य राहील. त्यानुसार या कार्यालयाने संदर्भिय दि.१८ जुलै, २०१७ रोजीच्या पत्रानुसार आरोग्य संकेतस्थळावर नोटीस/सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि सदर प्रक्रियेस काहिच प्रतिसाद मिळालेला नाही. यास्तव सदर प्रक्रिया राबविण्यासाठी प्रथम मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

या कार्यालयामध्ये क्लोज सर्कीट टी.व्ही.यंत्रणा बसविणेबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | क्लोज सर्कीट टी.व्ही.यंत्रणा बसविण्याबाबत कक्षनिहाय तपशिल | कॅमेरांची एकूण संख्या व क्षमता |
|---|---|---|
| १ | कार्यालयीन प्रांगणामध्ये (मुख्य इमारतीच्या पुढील बाजूस) | १ बुलेट कॅमेरा (३० मिटर कव्हरेज) |
| २ | शितसाखळी विभाग | २ डोम कॅमेरे (२० मिटर कव्हरेज) |
| ३ | एफ.एम.जी.शाखा | २ डोम कॅमेरे (२० मिटर कव्हरेज) |
| ४ | मुख्य इमारतीच्या शेजारील इमारतीमधील २ खोल्या व पॅसेज | २ डोम कॅमेरे (२० मिटर कव्हरेज) |
| ५ | मुख्य इमारत तळमजला (आरबीएसके/आरकेएसके/चाईल्ड हेल्थ/एसडीपी इत्यादि कक्ष) | २ डोम कॅमेरे (२० मिटर कव्हरेज) |
| ६ | मुख्य इमारत स्वागत कक्ष | १ डोम कॅमेरा (२० मिटर कव्हरेज) |
| ७ | मुख्य इमारत तळमजला (आस्था/र.व का./लेखा शाखा) | २ डोम कॅमेरे (२० मिटर कव्हरेज) आणि १ बुलेट कॅमेरा (३० मिटर कव्हरेज) |
| ८ | पहिला मजला पॅसेज | १ बुलेट कॅमेरा (३० मिटर कव्हरेज) |
| ९ | दुसरा मजला कक्ष-४, कक्ष-५, कक्ष-११, एमसीटीएस, पीसीपीएनडीटी कॉल सेंटर/ कक्ष-१० अ आणि ब/कक्ष-९ (एमआयएस) | ६ डोम कॅमेरे (२० मिटर कव्हरेज) आणि १ बुलेट कॅमेरा (३० मिटर कव्हरेज) |
| १० | मुख्य इमारतीच्या मागील बाजूस औषधी भांडार शाखा | २ डोम कॅमेरे (२० मिटर कव्हरेज) |
| ११ | मुख्य इमारतीच्या शेजारील इमारत पीसीपीएनडीटी कक्ष | २ डोम कॅमेरे (२० मिटर कव्हरेज) |
| | एकूण | २१ डोम कॅमेरे व ४ बुलेट कॅमेरे |

सदर यंत्रणा बसविण्यासाठी उपरोक्त प्रस्तावित केलेल्या कॅमेरांचे तांत्रिक स्पेसिफिकेशन हे खालील प्रमाणे आहे.

२ मेगा पिक्सल कॅमेरा H.D (High Definition), नाईट व्हिजन,
२० / ३० मिटर कव्हरेज (HIK Vision)

संदर्भिय शासन निर्णय, दि.१.१२.२०१६ मधील तरतुदीनुसार कार्यालयामध्ये क्लोज सर्कीट टी.व्ही.यंत्रणा बसविणेसाठी स्थानिक विक्रेते/पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

तेव्हा आपण उपरोक्त प्रस्तावित केल्यानुसार ही यंत्रणा बसविण्यास इच्छूक असल्यास खालील अटी व शर्तींप्रमाणे आपले सिलबंद दरपत्रके या कार्यालयास ही नोटीस (सूचना) प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांचे आंत या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

## अटी व शर्ती

१) दर हे संपूर्ण यंत्रणा बसवून ती स्पेसिफिकेशनप्रमाणे सुरु करुन देण्यापर्यन्त सर्व करांसहीत नमूद करावेत.
२) सदर यंत्रणेसाठी आवश्यक कॅमेरे (डोम व बुलेट), वायरिंग, डिजीटल व्हिडीओ रेकॉर्डर, हार्ड डिस्क, रॅक, इन्स्टॉलेशन चार्जेस, इतर किरकोळ खर्च इत्यादि तांत्रिक स्पेसिफिकेशननिहाय दर नमूद करण्यात यावेत.
३) शासकिय कार्यालयामध्ये अथवा खाजगी ठिकाणी क्लोज सर्कीट यंत्रणा समाधानकारकरित्या बसविल्याबाबतचा किमान २ वर्षांचा अनुभव असणे बंधनकारक राहील. तशी प्रमाणपत्रे सोबत जोडणे बंधनकारक राहील.
४) विहीत मुदतीमध्ये प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारण्यात येतील, अन्यथा नाकारण्यात येतील.
५) दरपत्रकांवरील नमूद केलेल्या दरांमध्ये खाडाखोड अथवा अंक गिरविलेले नसावेत.
६) दरपत्रके सिलबंद स्वरुपात या कार्यालयाकडे विहीत मुदतीत पाठवावीत.
७) दरपत्रकामध्ये सी.एस.टी. वॅट तसेच पॅन/टीन नंबर इ.नमूद करणे बंधनकारक राहील.
८) ही यंत्रणा बसविल्यानंतर त्याबाबत सर्व स्पेअरपार्टर्सची १ वर्ष वॉरंटी/गॅरंटी देणे बंधनकारक राहील.
९) सदर यंत्रणेमध्ये कोणताहि तांत्रिक बिघाड झाल्यास, या कार्यालयाकडून दूरध्वनीवरुन कळविताच १ तासाचे आंत आपला प्रतिनिधी कार्यालयामध्ये उपस्थित राहून ही यंत्रणा विनामोबदला दुरुस्त करणे बंधनकारक राहील. तसे रु.१००/- रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर लेखी स्वरुपात लिहून देणे बंधनकारक राहील.

१०) दरपत्रक मंजूर झाल्यानंतर यंत्रणेमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यास ओरिजनल स्पेअर पार्टसचा पुरवठा व नमूद केलेली कामे या कार्यालयामधून दूरध्वनी केल्यानंतर एका तासाचे आंत सुस्थितीत व समाधानकारकरित्या दुरुस्त करणे बंधनकारक राहिल. अन्यथा परचेस मॅन्युअल ऑफ स्टोअर्समधील तरतुदीनुसार एका आठवडयास अर्धा टक्का याप्रमाणे विलंब आकार वसूल केला जाईल.

११) उपरोक्त यंत्रणा बसविण्याबाबत मा.अतिरिक्त संचालक यांचा निर्णय अंतीम राहील. त्यांनी सर्व अधिकार राखून ठेवले आहेत.

१२) दरपत्रकांना प्रतिसाद न मिळाल्यास, अथवा त्यामध्ये काही त्रूटी आढळून आल्यास, ही दरपत्रके (नोटीस) प्रक्रीया स्विकारणे, नाकारणे अथवा रद्द करणे इ. अधिकार मा.अतिरिक्त संचालक यांना राहतील.

१३) वर नमूद केलेल्या अटी व शर्ती पूर्ण केलेली दरपत्रके ग्राहय धरली जातील, याची नोंद घ्यावी.

कृपया वरील नोटीस (सूचना) कोणत्याहि परिस्थितीत दि.३१.७.१७ रोजी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा,
कुटुंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे-१